Category - III Research paper in journals

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)**

**ISSN 2277 - 5730**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | २१ व्या शकतकातील भारतीय लोकशाही : आव्हाने आणि पुढील वाटचाल<br>**डॉ. अशोक सोनकांबळे** | १-४ |
| २ | लोकशाही व लोकसंख्या शिक्षणाचा वैज्ञानिक दृष्टीकोन<br>**प्रा. जी. व्ही. पांचाळ** | ५-७ |
| ३ | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने<br>**प्रा. विलास गायकवाड** | ८-१२ |
| ४ | भारतातील लोकशाही आणि आर्थिकसुधारणा<br>**डॉ. गोविंद राजाराम परडे** | १३-१६ |
| ५ | भारतीय समाजातील आदिवासी व अल्पसंख्याकांच्या समस्या<br>**डॉ. शिवाजी पवार** | १७-२३ |
| ६ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा. राजेश अनंतराव कांबळे** | २४-२७ |
| ७ | लोकशाही संकल्पना आणि वास्तव<br>**डॉ. उमाकांत राठोड** | २८-३० |
| ८ | आदिवीस समाजाच्या समस्या : समाजशास्त्रीय अध्ययन<br>**रत्नपारखे शिवशंकर अशोकराव** | ३१-३५ |
| ९ | नागरी समाज आणि लोकशाही<br>**रेणुका शिवाजी ईश्वरे** | ३६-४० |
| १० | दलित, आदिवासी समाज आणि अत्याचार प्रतिबंधक कायदा<br>**प्रा. संजय मारोतराव देबंडे** | ४१-४६ |
| ११ | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने<br>**डॉ. शंकर लेखणे** | ४७-५० |
| १२ | महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात शासनाची भूमिका : एक अभ्यास<br>**डॉ. ज्योती पुंजाराम महाजन** | ५१-५५ |
| १३ | नागरी समाज आणि लोकशाही<br>**डॉ. बाळासाहेब भिंगोले** | ५६-५७ |




Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

**डॉ. शंकर लेखणे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर.

**प्रस्तावना**

लोकशाही शासन व्यवस्थाही लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वात उपयुक्त अशी राज्य पध्दती म्हणून ओळखली जाते. सर्व लोकांच्याविचाराने आणि बहुमताच्या संमतीने निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी यात केली जाते. त्याच बरोबर निर्णयाची अंमलबजावणी होत असताना त्यावर नियंत्रण सुध्दा लोकांचेच असते. लोककल्याणसाधण्याचे उद्दिष्ट आणि सर्वानासमानसंधी देण्याचे ध्येय लोकशाही तसाध्य होण्याची अधिक शक्यता असते. म्हणून भारताने स्वातंत्र्य प्राप्ती नंतर लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकारकेला. अनेक वर्षाच्या राजशाही राजवटीनंतर स्वीकारलेली ही शासनपध्दती आपल्याला नवीन वाटत असली तरी तिला प्राचीनवारसा आहे. हजारो वर्षापूर्वी आपल्याकडे गणराज्ये होती, त्यात लोकशाहीची मूल्ये अंतर्भूतहोती. त्याच गणराज्याचे आजची लोकशाही शासनव्यवस्थाहे नवीनस्वरुप होय. असे आपणास म्हणता येईल.

**शोधनिबंधाचेउद्दिष्ट**

प्रस्तुत शोधनिबंधातून लोकशाहीची संकल्पना जाणून घेणार आहोत. तसेच भारतीय लोकशाही समोर असलेल्या प्रमुखआव्हानांचा आढावा देखील घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**संशोधनपध्दती**

प्रस्तुत शोधनिबंध वर्णनात्मक स्वरुपाचा असून त्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम स्रोताचा अवलंब करण्यात आलाआहे. विषयाशीसंबंधितसंदर्भग्रंथ, वैचारिकलेखइत्यादींचाअवलंबकरुनमांडणीकरण्यातआलाआहे.

**संकल्पनास्पष्टीकरण**

लोकशाही म्हणजे काय? व याशासन पध्दतीमध्ये कोणतीमूल्य व बाबी महत्वाच्या असतात. हेस्पष्ट करताना अब्राहमलिंकन यांनी लोकशाहीची केलेली व्याख्या विचारात घ्यावी लागते. ते म्हणतात, "लोकांनी, लोकांच्या हिता करिता, लोकां करिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही."1

डॉ. बाबासाहेबआंबेडकरांनी 1952 साली पुणे जिल्हा लॉलायब्ररीच्या सदस्यां पुढे बोलताना लोकशाहीची व्याख्या करताना म्हटले होते की, "लोकशाही म्हणजे जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणणारी

आणि याबदलांना जनतेने कोणत्याही प्रकारच्या विवादाचा अथवा रक्तपाताचा आसरा न घेता मान्यता द्यावी, अशी व्यवस्था होय"2

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची कल्पना ही प्रामुख्याने समाजवादी अर्थव्यवस्थेशी एकरुप झालेली कल्पना होती. म्हणून त्यांना राज्यसमाजवादाचे ध्येय साधण्यांसाठी राजकीय लोकशाही निरुपयोगी आहे असे वाटत होते. त्यासाठी ते राजकीय लोकशाहीचा पाया आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांचा मेळ घालू पहात होते. त्यांना 'एकमाणूस – एकमूल्य' हा सिध्दांत लोकशाहीचा आत्मा वाटत होता. दुर्दैवाने लोकशाहीची कल्पना म्हणजे 'एक मनुष्य – एक मत' अशी केली जाते. परंतु 'एक मनुष्य – एक मत' हा विचार 'एक मनुष्य – एक मूल्य' या विचारात विकसित होण्याच्या आवश्यकतेवर आंबेडकरांनी भर दिला आहे."3 लोकशाही शासनव्यवस्थेत केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक व आर्थिक या अंगानेही समता प्रस्थापित व्हावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असल्याचे दिसून येते.

गांधीवादी विचारवंत दादा धर्माधिकारी यांनी आपल्या 'सर्वोदयदर्शन'मध्ये लोकशाहीची संकल्पना स्पष्ट करताना लोकशाहीच्या निकोपवाढीसाठीचे मत मांडले आहे. ते म्हणतात, "लोकसता म्हणजे कुणाचेच कुणावर राज्य नव्हे, एकमेकांचे एकमेकांवर राज्य आहे असे मानले तर प्रत्येक जण दुसऱ्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतो, आणि मग उमेदवारांचे राजकारण सुरु होते. लोकशाहीत असे राजकारण राहणार नाही. आर्थिक क्षेत्रातील चढाओढीप्रमाणे राजकारणातही चढाओढ राहता कामा नये. लोकसतेचा संदर्भ बदलल्यावाचून, लोकसत्ता वास्तविक होणार नाही, ज्या संदर्भात आज विद्या, कला, गुण इत्यादी बाजारात विकले जातात त्यासंदर्भात लोकांच्या मतांचा बाजार होईल. लोकांच्या मतांचा मीना बाजार म्हणजे लोकसत्ता नव्हे, लोकशाही म्हणजे लिलाव नव्हे. आपणास अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल की, ज्यात लोकशाहीला कुणी बाजारात आणू शकणार नाही."4

**आशय विश्लेषण**

भारतीय लोकशाहीच्या आजपर्यंतच्या प्रवासावर जर आपण अवलोकनार्थ दृष्टिक्षेप टाकला तर आपणास दिसून येते की, जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था आणि नागरी स्थानिक संस्थांची निर्मिती करण्यात आली. त्याचबरोबर या व्यवस्था अधिक बळकट व्हाव्यात यासाठी 73 व 74 वी घटनादुरुस्ती करुन सर्व स्तरातील लोकांचा सहभाग होईल व या संस्था लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी उपयुक्त होतील यासाठी उल्लेखनीय प्रयत्न झालेले दिसून येतात.

डेव्हीड बीथॅम आणि केव्हीन बॉयल यांनी म्हटल्याप्रमाणे, "कुठल्याही लोकशाहीत चार घटक महत्वाचे ठरतात खुल्या आणि निर्भय निवडणूका, उत्तरदायी सरकार, सर्वांना नागरी व राजकीय हक्क आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणारा समाज यापैकी चौथा घटक हा केंद्रस्थानी असतो."5 यादृष्टीने विचार केला तर भारतीय लोकशाही व्यवस्थेने उल्लेखनीय वाटचाल केलेली दिसून येते. परंतु या वाटचालीत अनेक आव्हानेही असलेली दिसून येतात.



Scanned with CamScanner

भारतातील लोकसंख्येत स्त्रियांचा वाटा 50% पर्यंत असला तरी त्यांचा राजकीय प्रतिनिधीत्वाच्या दृष्टीने विचार केला तर आतापर्यंत केवळ स्थानिक संस्थामध्येच त्यांना सहभागी करुन घेण्यासाठी प्रयत्न झालेले दिसून येतात. पंचायतराज व्यवस्था व नागरी स्थानिक प्रशासनात स्त्रियांना 50% आरक्षणाची तरतूद करुन एक महत्वपूर्ण टप्पा आपण गाठला आहे. परंतु राज्य व केंद्राच्या स्तरावर मात्र त्यांचा उल्लेखनिय सहभाग नसल्याचे दिसून येते. प्रसाद कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, "भारत हा जगातील एक मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. पण येथे लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधीत्व फारच कमी आहे. जगातील एकूण लोकशाही व्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये महिला प्रतिनिधीत्वाचे सरासरी प्रमाण पंधरा टक्के आहे. भारतात ते त्यांच्यही निम्मे आहे."6 स्त्री पुरुष समता व महिला सबलीकरणाच्या दृष्टीने विचारमंथन मोठ्याप्रमाणावर होत असले तरी सर्वच क्षेत्रात होत असलेली महिलांची उपेक्षा व त्यांचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने असलेले मागासलेपण हे लोकशाही समोरील एक मोठे आव्हानच आहे.

स्त्रियांच्या उपेक्षेशी निगडित असलेला आणखी एक प्रश्न म्हणजे बालकामगारांचा आहे. लोकशाहीत सर्वांना समान न्याय मिळणे व त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावणे अपेक्षित असते परंतु आज अनेक अशिक्षित व दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांप्रमाणेच बालकेही शिक्षणापासून व शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत.

'भारत हा जगातील बालकामगाराबाबत पहिल्या क्रमांकाचा देश असून जगातील एकूण 40 कोटी बालकामगारांपैकी सुमारे 5 कोटी बालकामगार भारतात आहेत. याशिवाय उद्योग, व्यवसाय व शेतीक्षेत्रातील बालकामगारांची संख्या 15 कोटींच्या आसपास आहे.' याचा अर्थ लोकशाहीत अभिप्रेत असलेला सामाजिक न्याय अनेकक्षेत्रात अजून प्रस्थापित होऊ शकला नाही.

'समाजात व्यक्तीव्यक्तीमध्ये असणारी असमानता, अन्याय, शोषण नष्ट करणे व सहयोगाची भावना, मानवी प्रतिष्ठा निर्माण करणे, व्यक्ती महत्वाची असते ही मानसिकता निर्माण करणे म्हणजे सामाजिक न्याय होय.'8 असा सामाजिक न्याय अनेक कारणांमुळे भारतात बद्धमूल होऊ शकत नाही,

'सामाजिक विषमता, वर्णद्वेष, जातीव्यवस्था, आर्थिक विषमता, धार्मिक मतभेद इत्यादीमुळे लोकशाहीला धोका निर्माण होतो. आर्थिक डबघाईच्या काळात लोकशाही रुजत नाही.'9

कुपोषण, बालमृत्यू, अनारोग्य, शिक्षणाचा अभाव यासगळ्यांचे मूळ कारण गरीबी आहे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. समाजातील सत्ता आणि संपती यांचे विषम असे वितरण झाल्यामुळे अनेक लोक समान संधीचा लाभ घेऊ शकत नाहीत व त्यांच्यात समता नांदू शकत नाही.

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा विचार करताना ही परिस्थिती डोळसपणे ध्यानात घ्यावी लागेल. कारण डॉ.अशोक चौसाळकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'न्यायाच्या तत्वामध्ये तीन प्रकारच्या न्यायाचा समावेश होतो. त्यातील पहिला प्रकार वितरणात्मक न्यायाचा आहे. यात सत्ता व संपती यांचे समान वितरण अपेक्षित आहे, दुसरा प्रकार क्षतिपूरक न्यायाचा

आहे, ज्यात नुकसान भरपाईचे तत्व अनुस्यूत आहे आणि तिसरा प्रकार विनिमयाधारित आहे, ज्यात वस्तूंच्या विनिमयात विहित असणाऱ्या न्यायाचे तत्व महत्वाचे आहे.'10 या सर्वबाबींचा विचार केला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या अशा प्रश्नांचा संबंध केवळ त्या – त्या घटकांशी नाही तर समाजातील बदललेल्या मूल्यव्यवस्थेशी आहे. ही बदललेली मूल्य व्यवस्था सक्षमपणे स्वीकारण्यासाठी काही निर्णायक अशी वाटचाल लोकशाहीला करावी लागणार आहे.

**निष्कर्ष**

उपरोक्त अनेक समस्यांचा मागोवा घेतला असता प्रस्तुत शोधनिबंधाच्या दृष्टीने काही निष्कर्ष आजमावणे शक्य आहे. वरील प्रमाणे विपरित परिस्थिती असूनही लोकशाही सक्षम बनली पाहिजे यासाठी योग्य अशा संस्थांची जोपासना केली पाहिजे तरच लोकशाही बध्दमूल होऊ शकेल. राज्य चालवणारे प्रशासनातील अधिकारी, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, सचिवालय यांच्या कामातील नैपूण्य लोकशाहीसाठी महत्वाचे ठरते. वृतपत्रे, कामगार संघटना स्वयंसेवी संस्था सामाजिकसंस्था असे अनेक गट लोकशाहीला बळ देत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्या प्रमाणे सर्वात महत्वाचे म्हणजे 'समाजातील नैतिक अधिष्ठान कार्यशील ठेवणे लोकशाहीला अत्यावश्यक असते'[11]

संदर्भ

1 Wikipedia.org

2 डॉ. रावसाहेब कसबे, आंबेडकरवाद :तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे – 30, द्वि – आ. 2004, पृ. 44

3 कित्ता, पृ. 44

4 दादा धर्माधिकारी, सर्वोदय दर्शन, परंधाम प्रकाशन, पवनार, 2009, पृ. 215 ते 216

5 डेव्हिड बीथॅम व केव्हीन बॉयल, लोकशाही :ऐशी प्रश्न आणि उत्तरे, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 20 03, अनु. लीना मेहेंदळे, पृ. 22

6 प्रसाद कुलकर्णी, आरक्षण आणि सामाजिक न्याय, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, 2003, पृ. 4 ते 5

7 प्रा. लक्ष्मण कोतापल्ले, भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, विद्याबुक पब्लिकेशन औरंगाबाद, जून 2014, पृ. 278

8 कित्ता, पृ. 10 – 11

9 प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, आरक्षणाचे राजकारण आणि भारतातील लोकशाहीचे भवितव्य, आरक्षण आणि सामाजिक न्याय, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, 2003, पृ. 11

10 डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाही, संघर्ष प्रकाशन, नागपूर, 2014, पृ. 10



Scanned with CamScanner